# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक क्रमांक :- १३७

जा. क्र. झोपुप्रा/ मुकाअ/ कार्यासन-१/ परिपत्रक/ सन २०१२
प्रशासकीय इमारत, अनंत कानेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : ०१/०८/२०१२.

## परिपत्रक

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत पात्र झोपडीधारककांना सदनिका / गाळयाचे वाटप झाले नंतर ओळखपत्रे तयार करण्यासाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम पुनर्वसन योजनेच्या विकासकाकडून जमा करणेबाबत.

संदर्भ : प्राधिकरणाकडील परिपत्रक क्रमांक १०२, दिनांक ०७/०९/२००९.

झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत पात्र झोपडीधारकांना सदनिका / गाळयांचे वितरण झाल्यानंतर प्राधिकरणाकडून सदर झोपडीधारकांना ओळखपत्रे वितरण करण्याची तरतुद आहे. सदर योजने अंतर्गत सदनिका / गाळे वाटप झालेल्या कुटुंबातील पती पत्नी यांच्या जोडनांवे संगणकीय ओळखपत्रे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून देण्यात येतील असे वरील संदर्भिय परिपत्रकामध्ये स्पष्ट नमूद केलेले आहे. तथापी सदनिका / गाळयांचे वाटप झाले नंतर सदरची ओळखपत्रे तयार करुन जलद गतीने वितरीत होण्यासाठी नवीन एजेन्सीची नियुक्ती करणे व त्यांच्या मार्फत संगणकीय ओळखपत्रे तयार करुन पुनर्वसन योजने अंतर्गत पात्र झोपडीधारकांना वितरीत करण्यासाठी येणारा खर्च प्रती ओळखपत्र रुपये १००/- प्रमाणे विकासकाकडून घेणे आवश्यक आहे, यासाठी प्राधिकरणाकडील अभियांत्रिकी विभागाकडून पुनर्वसन योजनेतील इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) जारी करण्यापुर्वी त्यांनी प्रती पात्र झोपडीधारक रुपये १००/- या प्रमाणे संबंधीत पुनर्वसन योजनेच्या विकासकाकडून भरणा करुन घ्यावे. जेणे करुन सदर ओळखपत्रे तयार करण्यासाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम विकासकाकडून जमा करणे सुलभ होईल. सदरची कार्यपध्दती ही दिनांक ०१/०८/२०१२ पासून अमलांत येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.

प्रत,

१) सचिव, झो.पु.प्रा., मुंबई यांचे स्विय सहाय्यक,

२) वित्त नियनत्रक, झो.पु.प्रा., मुंबई यांचे स्विय सहाय्यक,

३) विधी सल्लागार विभाग, झो.पु.प्रा., मुंबई,

४) अभियांत्रिकी विभाग, झो.पु.प्रा., मुंबई,

५) उपजिल्हाधिकारी विभाग, झो.पु.प्रा., मुंबई,

६) सहकार विभाग, झो.पु.प्रा., मुंबई,

७) नगर रचनाकार विभाग, झो.पु.प्रा., मुंबई,

८) प्रशासन विभाग, झो.पु.प्रा., मुंबई,

९) माहिती व तंत्रज्ञान विभाग, झो.पु.प्रा., मुंबई.

कार्यकारी अभि- १

All AEs/SEs

Pl note & return.

Bawdekar
2/8/2012
EE I